# बृहन्मुंबई महानगरपालिका

## करनिर्धारण व संकलन खाते

म.न.पा. मुद्रणालय इमारत, ५४६, ३रा मजला, ना.म.जोशी मार्ग, भायखळा (प.), मुंबई ४०० ०११.

क्र.कवसं/१९४२ /नविन/२०२५-२६ दि.०३.११.२०२५

## * सूचना*

जाहिरात क्र/कवसं.१९१७/एमसी/२०२४-२५ दि.१६.०९.२०२४ अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'निरीक्षक' या संवर्गातील १७८ रिक्त पदे भरण्यारीता ऑनलाईन परीक्षा दि.१०.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर संपन्न झालेली आहेसदर . .परीक्षेचा निकाल दि१०.०३.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवडीच्या निकषानुसार 'सामाईक गुणवत्ता यादी' आणि उमेदवारांची शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे पडताळणी सापेक्ष 'सामाईक तात्पुरती निवड यादी' तसेच 'प्रवर्गनिहाय तात्पुरत्या निवड याद्या' दि.१६.०४.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत .

सदर तात्पुरत्या निवड यादीच्या अनुषंगाने विविध कारणांमुळे अपात्र ठरलेल्या उमेदवारांमुळे उपलब्ध झालेली पदे भरण्यासाठी निवडीच्या निकषानुसार तसेच इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची 'व्दितीय निवड यादी' मान महानगरपालिका आयुक्तअतिरिक्त . ये मंजुरीअन्व प्राप्तयांच्या (शहर)प्रसिध्द करण्यात येत आहे.

शैक्षणिक प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष प्रसारित करण्यात आलेल्या **व्दितीय निवड यादीमधील २७ उमेदवारांना** त्यांची सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांच्या पडताळणीकरीता उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात येत असून उमेदवाराने **दि.११.११.२०२५ व दि.१२.११.२०२५ रोजी** खालील तक्त्यात नमुद केलेल्या ठिकाणी विहित वेळेत पडताळणीकरीता उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पडताळणीकरीता अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचे नाव निवडयादी मधून वगळण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

*** <u>तक्ता</u> ***

| टेबल क्र. | उपस्थित रहावयाचा दिवस | उपस्थित रहावयाची वेळ | उमेदवाराचा व्दितीय निवड यादीतील अनु.क्रमांक | उपस्थित रहावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दि.११ नोव्हेंबर २०२५ | सकाळी १०.०० ते संध्या. ६.०० | अनु.क्र.१ ते १४ | करनिर्धारण व संकलन खाते मुख्य कार्यालय, म.न.पा. मुद्रणालय इमारत, ५४६, ३रा मजला, ना.म.जोशी मार्ग, भायखळा (प.), मुंबई ४०० ०११ |
| २. | दि.१२ नोव्हेंबर २०२५ | सकाळी १०.०० ते संध्या. ६.०० | अनु.क्र.१५ ते २७ | |

**★कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणा-या उमेदवारांकरीता आवश्यक सूचना :**

**१.** सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्जामध्ये माहिती भरुन, सदर अर्ज सोबत आणणे आवश्यक आहे.

**२.** माध्यमिक शालांत परीक्षा १०० गुणांचा मराठी विषयासह उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक व उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३.** कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या सर्व सेमीस्टरच्या गुणपत्रिका व पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**४.** मराठी व इंग्रजी टंकलेखनाची किमान ३० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनाचे व्यावसायिक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५.** डी.ओ.इ.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.इ.सी.टी.'चे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**६.** सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास, जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**७.** जन्म दिनांक समाविष्ट असलेला शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मदाखला सादर करणे आवश्यक आहे.

**८.** 'निरीक्षक' या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता प्रसारित केलेल्या क्र.कवसं/१९१७/एमसी/२०२४-२५ दि.१६.०९.२०२४ अन्वयेच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेनुसार, उमेदवाराने धारण केलेल्या सर्व शैक्षणिक आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रे तसेच सामाजिक आरक्षणांतर्गत आवश्यक असलेली **सर्व मूळ प्रमाणपत्रे** पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहेत.

**९.** समांतर आरक्षणांतर्गत (**महिला आरक्षण/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/खेळाडू/अंशकालीन पदवीधर) तसेच अनाथ व दिव्यांग आरक्षणांतर्गत** अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शासननिर्देशानुसार आवश्यक ती **सर्व मूळ प्रमाणपत्रे** सादर करणे आवश्यक आहे.

**१०.** अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता **अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** ते/त्या **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमी लेअर)** सक्षम **प्राधिका-याचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये वैध असलेले प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक आहे.

**११.** विवाहित महिला उमेदवारांनी **विवाह नोंदणी प्रमाणपत्र**, नावात बदल झाल्याबाबतचे **शासकीय राजपत्र** सादर करणे आवश्यक आहे.

१२. **दिव्यांग आरक्षणांतर्गत** अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय क्र.अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार किमान ४०% दिव्यांगत्व असल्याबाबतचे सक्षम शासकीय प्राधिका-यांनी दिलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२दि.२७.०६.२०२४ अन्वये **वैश्विक ओळखपत्र (UDID CARD)** सादर करणे अनिवार्य आहे

१३. वर नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे/इतर आवश्यक कागदपत्रांच्या **मूळ प्रतींसह**, **स्वसाक्षांकीत प्रतींचे तीन संच** पडताळणीकरीता सादर करणे आवश्यक आहेत.

१४. लेखनिकाची सुविधा घेतलेल्या दिव्यांग कर्मचा-यांनी लेखनिकाची शैक्षणिक पात्रताही निरीक्षक पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

१५. **सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास**, नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र (प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी राजीनामा देणे आवश्यक राहील) सादर करणे आवश्यक आहे.

१६. उमेदवारांनी **पोलिस ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता** आवश्यक असलेला संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयाचा पत्ता सोबत आणणे आवश्यक आहे.
**(जन्मापासून ते आत्तापर्यंत ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य होते त्या त्या प्रत्येक ठिकाणचा)**

१७. उपरोक्त बाबत काही शंका असल्यास दूरध्वनी क्र.०२२-२३००५७५४ किंवा ०२२-४८०१३६७० वर संपर्क साधावा.

सही/- दि.३०.१०.२०२५

**करनिर्धारक व संकलक (प्र.)**